३. प्रस्तावित पॅकेजेस मधील अंतर्भूत रस्ते तांत्रिक कारणास्तव आंतरीक फेरबदल करावयाचे झाल्यास, फेरबदलाचे अधिकार मा. मुख्य अभियंता, म.न.पा. यांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 706ः— {लोककर्म विभाग} नागपूर शहरातील डांबरी रस्त्यांच्या दुरावस्थे बाबत मा. लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, शहरातील डांबरी रस्त्यांची प्रत्यक्ष मौका तपासणी करण्यात आली यामध्ये दोष दायित्व कालावधी संपुष्टात न आलेल्या ३९८ कामांची पाहणी करण्यात आली असता,यात प्रथमदर्शी १८ रस्त्यांच्या कामांमध्ये दोष आढळल्याचे व त्यापैकी सर्वाधिक ०८ कामे मे. ओ.जी. बजाज, यांची असल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने मे. ओ.जी.बजाज यांचे विरूध्द् करावयाच्या खालील प्रस्तावित कार्यवाहीचा प्रश्न विचारात घेऊन,

१. मे. ओ.जी. बजाज, हे म.न.पा. मध्ये वर्ग—१—ब मधील पंजिकृत कंत्राटदार आहेत. त्यांचे पंजियन वर्ग—१—ब वरून पदावनत करून वर्ग —१—क मध्ये करणे.
२. मे. ओ.जी. बजाज यांना दिनांक ३१.०८.२०१६ पासून पुढील सहा (०६) महिन्यांकरिता निविदा प्रक्रियेत सहभाग करण्यास मज्जाव करणे.
३. मे. ओ.जी. बजाज, यांनी त्यांचे कडील कालबाहय झालेला जुना हॉ.मि.प्लॅन्ट बदलवून नविन हॉ.मि.प्लॅन्ट उभारल्यास व त्यास कार्यकारी अभियंता, हॉ.मि.प्लॅ. यांनी प्रमाणीत केल्यानंतर, म.न.पा.व्दारे यापूर्वी देण्यात आलेली डांबरी रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची तसेच दोष दायित्व कालावधी मधील कामांची दुरूस्ती करण्यास परवानगी देणे. नविन हॉ.मि.प्लॅ.व्दारे जुनी कामे व दोष दायित्व कालावधीतील रस्त्यांची दुरूस्ती संबंधातील कामे ही १५ नोव्हेंबर, २०१६ पावेतो पूर्ण करणे मे. ओ.जी. बजाज, यांना बंधनकारक राहील.
४. शहरातील विकास कामे प्रलंबित राहू नये यास्तव ज्या निविदेमध्ये मे. ओ.जी. बजाज, प्रथम निम्नतम निविदाकार आहे मात्र निविदा मंजूर व्हावयाची आहे अशा निविदेकरिता व्दितीय निम्नतम निविदाकाराशी दर वाटाघाटी करून, त्यांचे कडून काम विहित कालावधीत पूर्ण करून घेणे.
५. ज्या निविदांमध्ये मे. ओ.जी.बजाज, प्रथम निम्नतम निविदाकार नसतील व ०३ पेक्षा अधिक निविदा प्राप्त आहे ही संख्या तपासणी करावयाची असेल अशा निविदाबाबत त्यांची निविदा ग्राहय धरण्यात येईल.
६. मे. ओ.जी. बजाज, यांना सहा महिन्यांकरिता म्हणजेच दि. २८.०२.२०१७ पर्यंत निविदेत सहभागी होण्यास मज्जाव असल्याने, हा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखील दोष दायीत्व कालावधीतील कामे तसेच इतर कामे त्यांनी गुणवत्तापूर्वक केले असल्याचे सर्व संबंधित कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र मागविण्यात येईल व मा. आयुक्त, यांचे मंजुरी नंतरच त्यांना पुढील निविदेत सहभाग घेण्यास मान्यता देण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन,

**विषय क्र. ६७६ विषयाच्या अनुषंगाने एकूण १८ रस्त्यांचे कामांची प्रथम दर्शनी दोषी आढळल्याचे प्रशासनाचे मत आहे. यातील ८ रस्त्ये हे मे. ओ.जी. बजाज या कंत्राटदाराचे असून इतर १० रस्ते खालील कंत्राटदारांचे आहे.**

**१) मे. अमृत कन्स्ट्रक्शन, २) मे. प्रेमचंद राचूमल, ३) मे. आर.एम. गोपलानी, ४) मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन, ५) मे.अंकीत कन्स्ट्रक्शन, ६) मे. सेठ कन्स्ट्रक्शन, ७) मे. फोनिक्स इंजिनिअरींग, ८) मे. एल. सी. गुरुबक्षानी व ९) मे. अमृता कन्स्ट्रक्शन.**

प्रशासनाने जो प्रस्ताव सादर केला आहे तो फक्त एकाच कंत्राटदारा विरुध्द कार्यवाही करण्याचा प्रस्तावित केला आहे. प्रशासनाने असे वाटत नाही का की दोषदाईत्वाची जबाबदारी इतर उर्वरित १० रस्त्यांचे जे काम केले आहे त्या संबंधित कंत्राटदाराची नाही का ? ज्याअर्थी वर्ग-१(अ) मधून वर्ग-१(ब) मध्ये पदावनत करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. त्याअर्थी ही कार्यवाही इतर दोषी कंत्राटदारासंबंधी होऊ शकत नाही का ? यांचे प्रशासनाने उत्तर द्यावे.

प्रशासनाच्या मता नुसार उपरोक्त कार्यवाही करता येते आणि या कार्यवाही संबंधी प्रशासनाद्वारे इतर कंत्राटदारास सुचनापत्र देण्यात आलेले आहे. लवकरच या संबंधी पुढील कार्यवाही प्रशासनाद्वारे करण्यात येईल असे मत प्रशासनाद्वारे प्रगट केले.

स्थायी समितीचे असे मत झाले आहे की, मे. ओ.जी. बजाज यांच्यासहीत

१) मे. अमृत कन्स्ट्रक्शन, २) मे. प्रेमचंद राचूमल, ३) मे. आर.एम. गोपलानी,

४) मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन, ५) मे.अंकीत कन्स्ट्रक्शन, ६) मे. सेठ कन्स्ट्रक्शन,

७) मे. फोनिक्स इंजिनिअरींग, ८) मे. एल.सी. गुरुबक्षानी व ९) मे. अमृता कन्स्ट्रक्शन. या सर्व कंत्राटदारास तीन महिन्यासाठी वर्ग-१(अ) मधून पदावनत करुन वर्ग-१(ब) मध्ये करण्यास तसेच जी कंत्राटदार वर्ग-१ (अ) मध्ये नसतील व इतर वर्गामध्ये असेल अशा कंत्राटदारास त्यांना प्राप्त वर्गाच्या एक वर्ग खाली पदावनत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येते.

तसेच कंत्राटदाराने खालील बाबींची पुर्तता करुन घेणे प्रशासनास आवश्यक राहील.

१) दोषदाईत्व कालावधी संपुष्टात न आलेल्या सर्व रस्त्यांची कामे एक महिन्याच्या आत कंत्राटदारान पूर्ण करणे आवश्यक राहील व ही कामे गुणवत्तापूर्ण करुन घेणे प्रशासनास बंधनकारक राहील. दिलेल्या कालावधीच्या आत कंत्राटदाराने कामे न केल्यास अशा कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याचा प्रस्ताव स्थायी समितीस सादर करावा.

२) सर्व कंत्राटदारास प्रशासनाने दिलेल्या वेळेच्या आत हॉटमिक्स प्लॉन्ट डी.एम. ६० लावणे बंधनकारक राहील याची विहित मुदत मुख्य अभियंता ठरवेल.

३) सर्व कंत्राटदाराच्या हॉटमिक्स प्लॉन्टचे फिटनेस सर्टिफिकेट घेणे आवश्यक राहील. याबाबत याचा विहित कालावधी व विभाग निश्चित करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील त्यांच्या निर्देशानुसार कार्यकारी अभियंता काम करतील.

४) कंत्राटदाराने लावले हॉटमिक्स प्लॉन्ट जे डी.एम. ६० या ग्रेड मध्ये आहे ते प्रत्यक्षात मोक्यावर आहे किंवा नाही याची तपासणी प्रशासनाने करावी. तसेच कंत्राटदाराने हॉटमिक्स प्लॉन्ट संबंधी दिलेले बिल व इनव्हाईस यांची शहानिशा करुन त्या प्रमाणेच प्रत्यक्ष मोक्यावर प्लॉन्ट आहे किंवा नाही हे तपासावे.

५) वरील कंत्राटदारापैकी ज्या कंत्राटदारांनी ज्या-ज्या निविदांमध्ये सहभाग घेतला आहे व ज्या निविदा रितसर उघडण्यात आलेल्या आहे त्या सर्व निविदांचे कार्यादेश नियमाप्रमाणे देण्यात यावे व ज्या निविदा उघडल्या नाही त्या तातडीने उघडण्यात याव्या. तसेच प्रशासनाने वरील सर्व कंत्राटदारांच्या नवीन कामावर तांत्रिक दृष्टया योग्य निगराणी ठेवावी व कामे योग्य चाकोरीत व निविदा अटी व शर्ती प्रमाणे चालू आहे किंवा नाही तसेच कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही या संबंधिचा अहवाल एक महिन्यात स्थायी समिती समोर ठेवावा वरील सर्व सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 707:— नागपूर महानगरपालिकेतील मा. आयुक्तांच्या कक्षा {सा.प्र.वि.} जवळ व्हिडीओकॉन्फ्रसिंग प्रणालीसाठी आवश्यक उपकरणे घेण्याससाठी National Informatics Center (N.I.C.) च्या दर करारावर N.I.C. चे अधिकृत R.C. धारक M/s. Progilitgy Tech Pvt., Ltd यांचे कडून रु. ७,४२,९९५/— ची उपकरणे विकत घेण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 708:— प्रभाग क्र. 15 (ब) येथील विनोबा भावे नगर गल्ली नं {लोककर्म झोन 07} 2,4,6,8,9, येथील सिमेंट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अमित कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 29,65,200/— पेक्षा 12.33 टक्के कमी दराची रू. 25,99,587/— ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 709:— मौजा — भामटी, खसरा क्र. 19/4, रिंग रोड, {कार्य. अभि. (प्रकल्प)} त्रिमुर्तीनगर येथे नविन फायर स्टेशन व स्टॉफ क्वॉर्टर्स इमारतीचे बांधकाम करण्याच्या कामाचे प्राकलन रू. 5,59,93,520/— ला मान्यता प्रदान करणे व या कामास्तव प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. कोरान्ने कंसलटंट प्रा. लि. यांना एकुण प्रकल्प राशी रू. 5,48,95,605/— वर 2 टक्के दराने रू. 10,97,912/— सेवा शुल्क राशी देण्याचा प्रश्न तसेच या प्रकल्पाची स्थापत्य कामांची व विदयुतीकरणाच्या कामाची निविदा मागविण्याची परवानगी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 710:— जकात विभागाच्या रद्दीची विल्हेवाट लावण्याबाबत जकात {स्थानिक संस्था कर} सुरु असतांना दैनंदीन मोठया प्रमाणात बिजक, बिंदर, व आयातकर्त्याने सादर केलेले दस्ताऐवज, जकातीच्या पावत्या इ. रेकॉर्ड जमा होत होता. जकात सुरु असतांना २०१० मध्ये पूर्वी जमा झालेली संपूर्ण दस्ताऐवजांची ज्यांचा पुढे कोणताही उपयोग नव्हता, अशा जिर्ण झालेल्या रेकॉर्डची रद्दी म्हणून विल्हेवाट लावण्यात आली होती. सन २०१० नंतर ३१.०३.२०१३ पर्यंत ब-याच प्रमाणात रेकॉर्ड जमा झालेला आहे. तसेच १.४.२०१३ पासून स्थानिक संस्था कराची सुरुवात झाल्याने व सन २०१२-१३ पर्यंतचे जकातीचे लेखापरिक्षण देखील झाले असल्याने हा रेकॉर्ड मस्कासाथ रेकॉर्ड सेक्शन, महात्मा फुले मार्केट मधील विभागाचे गोडावून तसेच जकात नाका नं.१० वाडी येथील गोडावून, नाका नं.९ हिंगणा रोड नाका नं.८ खापरी नाका येथील गोडावून्स मध्ये तसेच जकात मुख्यालय-नाका नं. १३ येथे जमा आहे. जकात बंद झालेला असल्याने ह्या रेकॉर्डचा आता कोणताही उपयोग नसल्याने व खराब होत असल्याने रद्दी म्हणून याची विल्हेवाट लावणे गरजेचे आहे.

वरील नुसार विभागाकडील रद्दीबाबत नस्तीमध्ये अ-वर्गातील रद्दी व ब-वर्गातील रद्दी बाबत यादी संलग्न आहे. बाजार भावाचा अंदाज घेतला असता नस्तीमध्ये नमूद केल्यानुसार दर प्राप्त झाले आहेत. सदहू रद्दीबाबतचे दर निश्चितीकरण होवून रितसर निविदा प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याबाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 711</u>:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 35 अ व ब शारदानगर व भंडारा रोड ते चामट शाळा रस्ते डांबरीकरण करण्यास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दराची रु. 47,43,503/– राशीची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधून आर्थिक वर्ष 2016–17 मध्ये रु. 47,44,000/– लक्ष राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 712</u>:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 35 अ व ब मध्ये पारडी येथील आयुर्वेदिक दवाखाना समोर कॉंक्रीट रस्ता व शिवनगर झोपडपट्टी समोर रस्ते डांबरीकरण करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. एस.के. गुरुबक्षाणी यांची 3.88 टक्के कमी दरांची रु. 28,82,138/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001380803 मधून आर्थिक वर्ष 2016–17 मध्ये रु. 29,98,479/– लक्ष राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 713</u>:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 35–अ भरतवाडा रोड ते पुनापुर गावापर्यंत रस्ते डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदाकार मे. आर.एम. गोपलानी यांचे प्राकलनीय दराची रु. 33,43,307/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष स्थायी समिती पद क्र. (A22001330802) मधुन आर्थीक वर्ष २०१६–१७ मध्ये रु. ३३४४०००/– लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 714</u>:– {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 72 क अंतर्गत शारदा नगर जयताळा येथील रोडचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. २९,९७,३९९/– (एकोनतीस लक्ष, सत्त्यान्नव हजार, तिनशे नव्यान्नव फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 715</u>:– {लोककर्म झोन 05} मौजा–नरसाळा येथील यशनगर, किर्तीनगर आणि ज्ञानेश्वर नगर भागातील रस्त्याचे खडीकरण व सरफेस ड्रेसिंगचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी में. शांती इंटरप्रायजेस यांची १६.६६ टक्के कमी दराची युटीलिटी सर्व्हीसेस करिता लागणाऱ्या अतिरिक्त खर्च रू. ७,३९,९५९/– सह, रू. ८२,३५,१०६/– ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 716</u>:– प्रभाग क्र. ६१–अ अंतर्गत सर्वश्री नगर येथील रस्त्यांचे {लोककर्म झोन 05} डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई–निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. एस.के. गुरबक्षाणी यांची प्राक्कलनीय दराची व्दितीय निम्नतम निविदा राशी रू. २८,९५,०९२/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निम्नतम निविदाकार मे. ओ.जी. बजाज यांना प्राकलनीय दरावर काम देण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 717</u>:– {कारखाना विभाग} नागपूर महानगरपालिका आरोग्य विभाग अतंर्गत आरोग्य विषयक कामाकरीता आवश्यकतेनुसार 10 टन व 20 टन क्षमतेचे डोझर ईधंनासह/विनाइंधनासह मासिक भाडेतत्वावर घेण्याची मान्यता प्रदान

करने व वार्षीक दर करार निश्चीत करण्याकरीता ई–निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 718</u>:–
{कारखाना विभाग}

गांधीबाग झोन क्र. 06 करीता पद क्र. A4200137406 अतंर्गत रु. 56,70,000/– राशीच्या 01 नग सक्शन कम जेटींग (Suction Cum Jetting) मशीन खरेदी करण्याकरीता मान्यता प्रदान करुन ई–निविदा बोलविण्यास्तव मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 719</u>:–
{परीवहन विभाग}

नागपूर शहरबस वाहतुक संचलनाकरिता सद्य:स्थितीतील वाहतुकदार मे. वंश निमय इन्फाप्रोजेक्टस् लि. यांची सेवा असमाधानकारक असल्याने नविन ऑपरेटरद्वारे शहरबस संचलनाकरिता मनपा महासभा ठराव क्र १४४ व १४५, दि. २१/०८/२०१५ अन्वये नविन ऑपरेटर्सच्या नियुक्तीला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. Request for Proposal या निविदा प्रक्रियेद्वारे प्रस्तावित तिन डिझेल बस ऑपरेटर व एक ग्रीनबस ऑपरेटर आणि यांचेवर संपुर्ण संनियंत्रण ठेवणारे आय.बी.टी.एम. ऑपरेटर असे एकुण पाच ऑपरेटर यांचे संचलनास परिवहन समिती ठराव क्र. २३,२४ व २५ दि. २०/१०/२०१६ नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या प्रस्तावित पाच ऑपरेटर यांचे मासिक भुगतान करण्याकरिता मनपाच्या वतीने इस्क्रो अकाऊंट (Escrow Account) ची कायमस्वरूपी निर्मीती करतांना आराखड्यास अनुसरून सुरवातीस तिन महिन्याच्या रकमेची किमान पातळी ठेवण्याकरिता रु. ६० कोटी एवढया राशीची तरतुद आवश्यक आहे. तसेच बस वाहतुक सुरू झाल्यानंतर प्रतिमाह रू. १० कोटींचे समायोजन मनपा फंडातुन करणे आवश्यक आहे, असे परिवहन समितीचे ठराव क्र. २३, दि. २०/१०/२०१६ मध्ये निर्देशित केले आहे. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचा शहरबस वाहतुक प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्विकरण व राबविण्याच्या दृष्टीने मनपा निधितुन उपरोक्त वरील नमुद केल्याप्रमाणे रक्कम ''शहर परिवहन निधी'' (NMC The City Of Nagpur Transpor Fund) यामधे वळती करावयाची आहे, त्याकरिता स्थायी समितीची मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय एकमताने मंजूर तसेच म.न.पा. सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक राहिल किंवा आयुक्त म.न.पा. यांनी सुधारीत अंदाजपत्रकात तरतूद करावी व त्यानंतर म.न.पा.ची मंजुरी घ्यावी या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 720</u>:–
{सा.प्र.वि.}

सन 2016–17 चे प्रस्तावित अंदाजपत्रक सादर करताना मा. अध्यक्ष स्थायी समिती यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात ''विद्यार्थी सुरक्षा आणि कर्मचारी सुरक्षा विमा योजना'' अंतर्गत महानगरपालिकेत कार्यरत असलेले कर्मचारी यांच्या समुह विमा असतोच. परंतु महानगरपालिकेचे दायित्व समजुन विमा योजना सुरु करण्याचा निर्धार व्यक्त केला.

- भारतीय जीवन विमा निगम यांनी सामुहिक विमा योजने अंतर्गत ''कर्मचारी सुरक्षा योजना'' Group Term Insurance 01 वर्षाचा कालावधीचा विमा कवच उपलब्ध असेल.
- कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही प्रकारे मृत्यु झाल्यास रु. 1 लक्ष राशी त्यांच्या वारसदारांना या समुह विमा योजनेद्वारे देण्यात येईल.
- कर्मचाऱ्यांना मेडिकल क्लेम व एका वर्षाच्या आंत आत्महत्या केल्यास मिळणार नाही.
- कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा 18 ते 57 वर्षे पर्यंत राहिल.
- कर्मचाऱ्यांच्या वयोमानानुसार विमा प्रिमियम निश्चित करण्यात येईल.
- सामुहिक विम्याचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करावे लागेल.

अर्थसंकल्पीय पद क्र. A25002021306 प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता सुरक्षा विमा योजना (अपघाती प्रिमियम) विद्यार्थ्यांकरिता सुरक्षा योजना करीता या व्यय शिर्षा अंतर्गत रु. 225.00 लक्ष ची तरतूद करण्यात आली आहे. म.न.पा. स्थायी कर्मचारी यांचा अपघाती/नैसर्गिक मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसदारांना भारतीय जीवन बीमा निगम यांचेकडुन रु. 1 लक्ष या समुह विमा योजनेद्वारे देण्यात येईल. यास्तव सेवाकरासह 1 वर्षाकरिता रु. 32,36,072/– चे खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 721</u>:– {कारखाना विभाग} गांधीबाग झोन क्र. 06 करीता पद क्र. A4200137406 अतंर्गत रु. 16,04,417/– राशीचे 01 नग टाटा कंपणीचे टिप्पर (10 Cubmtr. Box Type SK 1613/42 BS III) DGS&D दरावर प्रो–फार्मा ईन्वाईस व्दारे Delevery Against Payment या तत्वावर खरेदी करण्याच्या तसेच रु. 25,17,329/– राशीचे 01 नग बॅक हो लोडर रितसर पध्दतीणे खरेदी करण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 722</u>:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 34 अ मधील मिनीमातानगर आणि चंद्रनगर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांचे बांधकामास्तव प्राप्त निविदाकार मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांचे प्राकलनीय दरापेक्षा 11.92 टक्के कमी दराची रु. 42,65,478/– राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. या कामाचा खर्च पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 723</u>:– {कार्य. अभि. प्रकल्प} सोख्ता भवन, गांधीबाग येथे "नागरी सुविधा केंद्र व वाणीज्य संकूल" या प्रकल्पाचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्याचे कामाकरिता नेमलेल्या PMC चे फी दर व नमुना करारनाम्यास मंजुरी बाबत.

सोख्ता भवन, गांधीबाग येथे "नागरी सुविधा केंद्र व वाणीज्य संकूल" या प्रकल्पाचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्याचे सन 2012–13 चे अंदाजपत्रकात प्रस्तावित होते त्याकरिता मनपाच्या पॅनलवरील नोंदणी असलेले प्रकल्प सल्लागार मे. डिजाईन सेल, नागपूर (आर्किटेक श्री. प्रशांत सातपूते ) यांना प्रकल्प आराखडा व व्यवहार्यता अहवाल तयार करण्याबाबत कळविण्यात आले होते. या प्रकल्पाकरीता मे. डिजाईन सेल, नागपूर यांना म.न.पा.चे प्रचलित नियमानुसार नियुक्ती करणे व हा प्रकल्प बी.ओ.टी तत्वावर उभारण्याकरीता तयार केलेल्या निविदा प्रारूप, Pre bid informative post qualification, contract/bid documents इत्यादीची स्थायी समिती ठराव, 467 दि. 23.02.2013 अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली. त्यानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांचे पत्र क्र. 298/EE(P) दि. 30.10.2013 अन्वये मे. डिजाईन सेल यांना प्रकल्प सल्लागार व पी.एम.सी. बाबत कार्यकारी अभियंता (प्रकल्प) मार्फत letter of Acceptance देण्यात आला व त्या अनुषंगाने सल्लागाराने (पी.एम.सी.) ने म.न.पा. द्वारे वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या बदलानुसार काम केले आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पावर सल्लागारातर्फे बरेच काम झालेले आहे व नकाशे सुध्दा मंजूरी स्तरावर आहे. त्यामूळे प्रकल्प सल्लागारास कार्यारंभ आदेश जरी दयावा लागत असला तरी त्यास पूर्वलक्षीत प्रभावाने मान्य करणे आवश्यक राहील.

स्थायी समिती ठराव क्र. 17, दि. 18.05.2009 अन्वये मंजुर धोरणातील मंजुर दरामध्ये स्थायी समिती ठराव क्र. 49 दि. 20.01.2016 नुसार बदल करण्यात आला.

सद्यस्थितीत प्रकल्प विभागातर्फे प्रकल्प सल्लागार व पी.एम.सी. सोबत करावयाच्या करारनाम्याचे प्रारूप तयार करण्यात आले असुन त्यामध्ये स्थायी समिती ठराव क्र. 467, दि. 23.02.2013 अन्वये मंजुर करण्यात आलेल्या सल्लागार फि कायम ठेवून सल्लागारास भुगतान करावयाच्या प्रमाणात व कालावधीत खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या आहे.

i. Schedule I नुसार कामाची जबाबदारी/व्याप्ती Defect Liability Period पर्यंत वाढविण्यात आली

आहे.

ii. Schedule III नुसार पी.एम.सी. कडे सुशिक्षित व प्रशिक्षित staff असणे बंधनकारक केले आहे.

iii. सुधारीत करारनाम्यात Risk assessment, penalty for non performanance चा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

iv. Pre tender activity करीता एकुण देय राशीच्या 3 टक्के राशी Performance Guarantee बंधनकारक केली आहे.

v. Pre tender activity करीता देय फीस प्रकल्प राशीच्या टक्केवारी ऐवजी प्रकल्प राशीच्या वर्गवारीनुसार fixed करण्यात आली आहे. जसे

**Schedule – II**

- Pre Tender Activity करीता करावयाचे भुगतान

1) Performance Guarantee Amount Rs. : 3% of the pre tender fee as below
(for Pre Tender Activities)

2) Contract Amount (Fees) Rs.

| | | |
|---|---|---|
| (A) For Pre tender Activities<br>To be paid by NMC | : | Rs. 15 Lakhs upto 50 crores project cost.<br>Rs. 20 Lakhs upto 100 crores project cost.<br>Rs. 4 Lakhs will be added to 20 lakh for every 100 crores additional project cost upto 500 crores. |
| | : | Rs. 60 lakhs only above 500 crores. |

- Post Tender Activity करीता करावयाचे भुगतान

पी.एम.सी. ला Post Tender Activity करीता खालीलप्रमाणे भुगतान प्रस्तावित आहे.

Post Tender Activity करीता एकुण देय राशी = $(P_o)$

= एकुण निविदा राशीच्या 2.76 टक्के ( – ) Pre Tender Activity करीता करण्यात आलेले भुगतान

करारनाम्याच्या सर्व साधारण शर्ती व अटी अत्यंत पारदर्शक, विस्तृत, व्यापक व स्वयंस्पष्ट आहेत.(करारनाम्याचे प्रारूप नस्तीत जोडले आहे) जुन्या मंजुर ठरावाचे तुलनेत नविन ठरावानुसार बदल असल्याने त्याकरीता सुधारित करारनामा, कामाचा scope, fee structure नव्याने तयार करण्यात आला असून draft करारनामा अभियोक्ता विभागाकडून तपासण्यात आला आहे.

सोख्ता भवन, गांधीबाग येथे “नागरी सुविधा केंद्र व वाणीज्य संकूल” या प्रकल्पाचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्याकरिता पी.एम.सी. च्या नेमणुकीकरीता दि. 20.01.2016 च्या ठरावानुसार प्रचलीत असलेल्या धोरणास या प्रकरणी व लागु न करता पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. 467, दि. 23.02.2013 अन्वये मंजुर केल्यानुसार 2.76 टक्के ( स्थायी समिती ठराव क्र. 17, दि. 18. 05.2009 अन्वये मंजुर ) दरानुसार भुगतान करण्यास मंजुरी प्रदान करणे तसेच विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या करारनामा तसेच करारनाम्यातील शर्ती व अटीनुसार पद क्र. A 22801322807 अंतर्गत आवश्यक प्रावधानासह तसेच मे. डिजाईन सेल यांची त्यांनी सुरूवात केलेल्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने नियुक्ती करण्यास व कार्यारंभ आदेश देण्यास मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 724</u>:— केळीबाग रोड बुधवार बाजाराचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्याचे कामाकरिता नेमलेल्या PMC चे फी दर व नमुना करारनाम्यास मंजुरी बाबत **{कार्य. अभि. प्रकल्प}**

महाल येथील केळीबाग रोडवरील जुन्या भाजी बाजाराच जागेवर नव्याने बी. ओ.टी. तत्वावर विकास करण्याचे सन 2012—13 चे अंदाजपत्रकात प्रस्तावित होते त्याकरिता मनपाच्या पॅनलवरील नोंदणी असलेले प्रकल्प सल्लागार मे. लेट्स बिल्ड असोसिएट्स, नागपूर (प्रोप्रा. श्री. प्रियदर्शन नागपूरकर) यांना प्रकल्प आराखडा व व्यवहार्यता अहवाल तयार करण्याबाबत कळविले होते या प्रकल्पाकरिता मे. लेट्स बिल्ड यांना म.न.पा. चे प्रचलित नियमानुसार नियुक्ती करणे व हा प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर उभारण्याकरीता तयार केलेल्या निविदा प्रारूप, Pre bid informative post qualification, contract/bid documents इत्यादीची स्थायी समिती ठराव, 469 दि. 23.02.2013 अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली. त्यानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प) यांचे पत्र क्र. 297/EE(P) दि. 30.10.2013 अन्वये मे. लेट्स बिल्ड यांना प्रकल्प सल्लागार व पी.एम.सी. बाबत letter of Acceptance देण्यात आला. त्या अनुषंगाने सल्लागाराने (पी.एम.सी.) ने म.न.पा. द्वारे वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या बदलानुसार काम केले आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पावर सल्लागारातर्फे बरेच काम झालेले आहे व नकाशे सुध्दा मंजूरी स्तरावर आहे. त्यामूळे प्रकल्प सल्लागारास आज कार्यारंभ आदेश जरी दयावा लागत असला तरी त्यास पूर्व लक्षित प्रभावाने मान्य करणे आवश्यक राहील.

स्थायी समिती ठराव क्र. 17, दि. 18.05.2009 अन्वये मंजुर धोरणातील मंजुर दरामध्ये स्थायी समिती ठराव क्र. 49 दि. 20.01.2016 नुसार काही धोरणात्मक बदल करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत प्रकल्प विभागातर्फे प्रकल्प सल्लागार व पी.एम.सी. सोबत करावयाच्या करारनाम्याचे प्रारूप तयार करण्यात आले असुन त्यामध्ये स्थायी समिती ठराव क्र. 469, दि. 23.02.2013 अन्वये मंजुर करण्यात आलेल्या सल्लागार फि कायम ठेवून सल्लागारास भुगतान करावयाच्या प्रमाणाात व कालावधीत खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या आहे.

i. Schedule I नुसार कामाची जबाबदारी/व्याप्ती Defect Liability Period पर्यंत वाढविण्यात आली आहे.

ii. Schedule III नुसार पी.एम.सी. कडे सुशिक्षित व प्रशिक्षित staff असणे बंधनकारक केले आहे.

iii. सुधारीत करारनाम्यात Risk assessment, penalty for non performanance चा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

iv. Pre tender activity करीता एकुण देय राशीच्या 3 टक्के राशी Performance Guarantee बंधनकारक केली आहे.

v. Pre tender activity करीता देय फीस प्रकल्प राशीच्या टक्केवारी ऐवजी प्रकल्प राशीच्या वर्गवारीनुसार fixed करण्यात आली आहे. जसे

**Schedule – II**

- Pre Tender Activity करीता करावयाचे भुगतान

1) Performance Guarantee Amount Rs. (for Pre Tender Activities) : 3% of the pre tender fee as below

2) Contract Amount (Fees) Rs.

(A) For Pre tender Activities To be paid by NMC : Rs. 15 Lakhs upto 50 crores project cost.
Rs. 20 Lakhs upto 100 crores project cost.
Rs. 4 Lakhs will be added to 20 lakh for every 100 crores additional project cost upto 500 crores.
: Rs. 60 lakhs only above 500 crores.

- Post Tender Activity करीता करावयाचे भुगतान

पी.एम.सी. ला Post Tender Activity करीता खालीलप्रमाणे भुगतान प्रस्तावित आहे.

Post Tender Activity करीता एकुण देय राशी = $(P_o)$

= एकुण निविदा राशीच्या 2.76 टक्के ( – ) Pre Tender Activity करीता करण्यात आलेले भुगतान

Post Tender Activity करीता देय फीस विकासकामार्फतच देय राहील. म.न.पा. तर्फे पी.एम.सी. ला फक्त Pre tender activity पर्यंतचीच राशी दयावयाची असून या अटीची नोंद निविदा प्रपत्रात करण्यात येईल.

करारनाम्याच्या सर्व साधारण शर्ती व अटी अत्यंत पारदर्शक, विस्तृत, व्यापक व स्वयंस्पष्ट आहेत. (करारनाम्याचे प्रारूप नस्तीत जोडलेले आहे.) व जुन्या मंजुर ठरावाचे तुलनेत नविन ठरावानुसार मोठा बदल प्रस्तावित असल्याने त्याकरिता सुधारित करारनामा, कामाचा scope, fee structure नव्याने तयार करण्यात आला असून draft करारनामा अभियोक्ता विभागाकडून तपासण्यात आला आहे.

करीता केळीबाग रोड महाल येथील बुधवार बाजाराचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्याकरिता पी.एम.सी. च्या नेमणुकीकरीता दि. 20.01.2016 च्या ठरावानुसार प्रचलीत असलेल्या धोरणास या प्रकरणी व लागु न करता पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. 49 दि. 20. 01.2016 नुसार पूर्वीच्याच स्थायी समिती ठराव क्र. 469, दि. 23.02.2013 अन्वये मंजुर केल्यानुसार 2.76 टक्के ( स्थायी समिती ठराव क्र. 17, दि. 18. 05.2009 अन्वये मंजुर ) दरानुसार भुगतान करण्यास मंजुरी प्रदान करणे तसेच विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या करारनामा तसेच करारनाम्यातील शर्ती व अटीनुसार पद क्र. A 22801322807 अंतर्गत आवश्यक प्रावधानासह तसेच मे. लेट्स बिल्ड ॲण्ड असोसिएस्ट्स यांची त्यांनी सुरूवात केलेल्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने नियुक्ती करण्यास व कार्यारंभ आदेश देण्यास मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापती :– प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी 60 टक्क्यांचे जे परिपत्रक काढले आहे ते पत्र झोनल फंड, वार्ड फंड आणि फिक्स प्रायरिटी या तीन फंडाच्या कामाकरिता मान्य करण्यात येत नाही याची विभागाने दखल घ्यावी. कंत्राटदार श्री.ओ.जी.बजाज ने ज्या निविदा सादर केल्या आहेत त्याबाबत प्रशासनाने उचित कारवाई करावी, श्री.ओ.जी बाजाजच्या ज्या निविदा उघडल्या नाही त्या उघडण्यात याव्यात याबाबत योग्य ती कारवाई करुन त्याचा अहवाल 1 महिन्याच्या आत स्थायी समितीकडे सादर करावा.

<u>ठराव क्रमांक 725</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर